डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – **cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in**

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २८४ /२०२५ दि. २७/१२/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत **दिनांक २९/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पर्यंत दरोरोज संध्याकाळी १६:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो** डोंबिवली पुर्व आप्पा दातार चौक, फडके रोड, गणेश मंदीर रोड डोंबिवली पुर्व येथे **गणेश मंदीर संस्थान डोंबिवली पुर्व** तर्फे संगीत महोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास डोंबिवली शहरातील नागरीक व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमामुळे गणपती मंदीर रोड, फडके रोड डोंबिवली पुर्व या भागात वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद– कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या ठाकुर्ली जोशी हायस्कुल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती मंदीर गेट जवळ, नेहरू रोड** येथे व छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे गणेश मंदीर कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आप्पा दातार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– ठाकुर्ली जोशी हायस्कुल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणारी वाहने सरळ येवुन **टिळक रोडने सावरकर रोड** अथवा **मदन ठाकरे चौक** येथुन व छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे गणेश मंदीर कडे येणारी वाहने डावे वळण घेवुन **सावरकर रोड** अथवा **टिळक रोडमार्गे** इच्छित स्थळी जातील.

नो पार्कींगं– फडके रोडवरील आप्पा दातार चौक ते मदन ठाकरे चौक दरम्यान रस्ता **''नो पार्किंग''** करण्यात येत आहे.

पर्यायी पार्किंग– सदर रोडवरील वाहन चालकांना मदन ठाकरे चौक ते अंबिका हॉटेल कॉर्नर दरम्यान पी १, पी २ पार्किंग उपलब्ध आहे.

सदर अधिसूचना **दि. २९/१२/२०२५ रोजी पासुन ते दि.३१/१२/२०२५ रोजी पर्यंत दररोज सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर